ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा या स्थळास ‘ब’ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक बैठक २०१६/३/प्र.क्र.२४७/ पर्यटन,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : २७ मे, २०१९.

संदर्भ :- १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य, शासन निर्णय क्र. टिडीएस २०१०/८/प्र.क्र.४६३/पर्यटन, दि.४/११/२०१०.

२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य, शासन निर्णय क्र. टिडीएस २०११/१२/प्र.क्र.८५५/पर्यटन, दि.१६/१/२०१२.

३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य, शासन निर्णय क्र. टिडीएस २०१६/११/प्र.क्र.८६२/पर्यटन, दि.२५/४/२०१७.

४) जिल्हाधिकारी, सातारा यांचे पत्र क्र. जिनिससा/सांस/प्राप/२०१८-१९/का-६/१०८, दि.०८/०१/२०१९.

प्रस्तावना :

जिल्ह्यातील ‘ब’ वर्ग पर्यटनस्थळांची निवड करुन प्रस्ताव शासनाला सादर करणे याबाबतचे अधिकार संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयामधील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस प्रदान करण्यात आले आहेत. तसेच राज्यातील ‘ब’ वर्ग पर्यटनस्थळ घोषित करण्यासाठी संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये निकष व कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा या ऐतिहासिक ‘क’ वर्ग पर्यटन स्थळाच्या ठिकाणी सन २००४ मध्ये शासनातर्फे सावित्रीबाई फुले यांचे राज्य संरक्षित राष्ट्रीय स्मारक उभारण्यात आले आहे. तसेच या ठिकाणी आद्य स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील घडलेल्या निवडक प्रसंगांची उठावदार शिल्पे असणारी शिल्पसृष्टी उभारण्यात आली आहे. मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथे दरवर्षी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी म्हणजेच ०३ जानेवारी रोजी शासकीय कार्यक्रम साजरा करण्यात येतो.

३. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती घेण्यासाठी विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक सहली वर्षभर मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा या

ठिकाणी भेट देतात. जिल्हाधिकारी, सातारा यांनी मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा या स्थळास ‘ब’ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची शिफारस केलेली आहे. त्यामुळे मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा या स्थळास पर्यटनस्थळाचा ‘ब’ वर्ग दर्जा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टिडीएस २०१६/११/प्र.क्र.८६२/पर्यटन, दि.२५/४/२०१७ अन्वये राज्यातील ‘ब’ वर्ग पर्यटनस्थळे घोषित करण्यासाठी निकष व कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा हे ठिकाण भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असल्यामुळे या ठिकाणास त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती घेण्यासाठी विविध सामाजिक संस्था, शैक्षाणिक सहली वर्षभर मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथे भेट देतात. सदर ठिकाणास दरवर्षी ५ लाखापेक्षा अधिक पर्यटक भेट देतात. वरील सर्व पार्श्वभूमी विचारात घेता भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव असलेल्या मौजे नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा या स्थळास या शासन निर्णयाव्दारे ‘ब’ वर्ग पर्यटनस्थळ म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६०४१७५३५४२०२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ramesh
Jayaram Kadam

Digitally signed by Ramesh Jayaram Kadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=931a917c29ea693ba9abee543d58bf1b6ade60ae69c9be92f59d232bb3a3fcc8, serialNumber=c8fbeb4e149e205d858dabb5d81a2a90a8deb719257572300ef79cfab47d9345, cn=Ramesh Jayaram Kadam
Date: 2019.06.04 18:01:25 +05'30'

(र. ज. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्राचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद
६) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा
१३) विभागीय आयुक्त, पुणे.
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.
१५) जिल्हाधिकारी, सातारा.
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा
१७) अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन समन्वय अधिकारी, सातारा

७) सर्व मा. विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद
८) सर्व मा. विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा
९) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव
१०) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव
११) सचिव, ग्राम विकास विभाग, मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
१२) प्रधान सचिव (पर्यटन) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) नियोजन विभाग, मंत्रलाय, मुंबई.
१९) वित्त विभाग, मंत्रलाय, मुंबई.
२०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२१) जिल्हा नियोजन अधिकारी, सातारा
२२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची सर्व कार्यासने
२३) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
२४) निवड नस्ती, पर्यटन